महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून पुरविण्यात येणा-या तांत्रिक मनुष्यबळास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग (मातं)
शासन निर्णय क्र.संकीर्ण-1725/प्र.क्र.206/(मातं
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-400 032.
दिनांक: 31 मार्च, 2026

संदर्भ : १) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-1716/प्र.क्र.286/39, दिनांक 09.08.2016.
2) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-1716/प्र.क्र.47/39, दिनांक 27.09.2022.
3) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-1716/प्र.क्र.47/39, दिनांक 03.10.2025.
4) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-1716/प्र.क्र.47/39, दिनांक 01.01.2026.

प्रस्तावना: -

संदर्भ क्र. 1 येथील शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.3.4 अन्वये विहित केलेल्या तरतुदींनुसार हे महामंडळ राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे तसेच केंद्र अथवा राज्याने पारित केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या तसेच संस्था यांचे साठी माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यित सेवांकरिता मनुष्यबळ पुरवठा करणारी राज्याची एकमेव यंत्रणा आहे. संदर्भ क्र.2 येथील शासन निर्णयान्वये माहिती व तंत्रज्ञान महामंडळाकडून तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करण्याबाबत सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांच्याकडून माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यित सेवांकरीता तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्याकरीता निविदा प्रक्रिया राबवून त्यामध्ये सात संस्थांचा पॅनलमध्ये समावेश करण्यात आला होता.

सदर शासन निर्णय हा दि.01.10.2022 पासून पुढील 3 वर्षाकरिता म्हणजेच दि.30.09.2025 वैध होता. तद्नंतर संदर्भ क्र.3 येथील शासन निर्णयान्वये पुढे 3 महिन्यासाठी म्हणजेच दि. 30.12.2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तद्नंतर संदर्भ क्र.4 येथील शासन निर्णयान्वये सदर मुदतवाढीचा कालावधी दि.01.01.2026 पासून पुढे 3 महिन्यांसाठी वाढविण्यात आला आहे. तथापि, या प्रकरणी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून संस्थांची निवड करण्याची प्रक्रिया सुरु असून सदर प्रक्रिया पूर्ण होण्यास काही वेळ लागणे अपेक्षित आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेवून यापुढील कालावधीसाठी निविदा प्रक्रिया राबविणे व संस्थांची निवड करुन अंमलबजावणीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता संदर्भ क्र.2 येथील दि.27.09.2022 रोजीच्या शासन निर्णयास आणखी दि. 01.04.2026 पासून 2 महिन्यांसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:

महाआयटी व्दारे सद्यस्थितीत सुरु असलेली मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन व त्यानुसार नव्याने संस्थांची निवड करुन अंमलबजावणीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता संदर्भ क्र. 2 येथील दि.27.09.2022 रोजीच्या शासन निर्णयास आणखी पुढे 2 महिन्यांसाठी म्हणजेच दि.31.05. 2026 रोजीपर्यंत किंवा महाराष्ट्र माहिती

तंत्रज्ञान महामंडळाकडून मनुष्यबळ पुरविण्याची निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही पुर्ण होऊन शासन निर्णय निर्गमित होई पर्यंत, जे अगोदर घडेल, तो पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक असा आहे. हा निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by
DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 31-03-2026 16:25:06

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) मा. राज्यपालांचे सचिव,

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,

३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई

४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई

५) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,

६) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

७) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई

८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई

९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

१०) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,

१२) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,

१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,

१४) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१६) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१७) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

१९) सर्व पोलीस आयुक्त,

२०) सर्व विभागीय आयुक्त,

२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

२३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

२४) सर्व जिल्हाधिकारी,

२५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२६) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,

२७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,

२८) सर्व मंत्रालयीन विभाग,

२९) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई,

३०) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

३१) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

३२) निवडनस्ती (का. मातं).